# .. Dasbodh by Samartha Ramdasswami Chapter 10 ..

# ॥ समर्थ रामदासांचा दासबोध दशक १० ॥

दशक दहावा। :। जगज्जोतीनाम
समास पहिला। :। अंतःकरणैकनिरुपण
। । । । ॥ श्रीराम ॥
सकळांचे अंतःकरण येक। किंवा येक नव्हे अनेक ।
ऐसें हे निश्चयात्मक। मज निरोपावें ॥ १ ॥
ऐसें श्रोतयानें पुसिलें। अंतःकरण येक किं वेगळालें ।
याचे उत्तर ऐकिलें पाहिजे श्रोतीं ॥ २ ॥
समस्तांचे अंतःकर्ण येक निश्चयो जाणावा नेमक ।
हा प्रत्ययाचा विवेक। तुज निरोपिला ॥ ३ ॥
श्रोता म्हणे वक्तयासी। अंतःकरण येक समस्तांसी ।
तरी मिळेना येकायेकासी। काये निमित्य ॥ ४ ॥
येक जेवितां अवघे धाले। येक निवतां अवघे निवाले ।
येक मरतां अवघे मेले। पाहिजेत कीं ॥ ५ ॥
येक सुखी येक दुःखी। ऐसें वर्ततें लोकिकीं ।
येका अंतःकरणाची वोळखी। कैसी जाणावी ॥ ६ ॥
जनीं वेगळाली भावना। कोणास कोणीच मिळेना ।
म्हणौन हें अनुमाना। येत नाही ॥ ७ ॥
अंतःकरण येक असतें। तरी येकाचें येकास कळों येतें ।
कांहीं चोरितांच न येतें। गौप्य गुह्य ॥ ८ ॥
याकरणें अनुमानेना। अंतःकरण येक हें घडेना ।
विरोध लागला जना। काये निमित्य ॥ ९ ॥
सर्प डसाया येतो। प्राणी भेऊन पळतो ।
येक अंतःकरण तेरी तो। विरोध नसावा ॥ १० ॥
ऐसी श्रोतयांची आशंका। वक्ता म्हणे चळों नका ।
सावध होऊन ऐका। निरूपण ॥ ११ ॥
अंतःकर्ण म्हणिजे जाणीव। जाणिव जाणता स्वभाव ।
देहरक्षणाचा उपाव। जाणती कळा ॥ १२ ॥
सर्प जाणोन डंखूं आला। प्राणी जाणोन पळाला ।
दोहींकडे जाणीवेला। बरें पाहा ॥ १३ ॥
दोहींकडे जाणीवेसी पाहिलें। तरी अंतःकर्ण येकचि जालें ।
विचारितां प्रत्यया आलें। जाणीवरूपें ॥ १४ ॥
जाणीवरूपें अंतःकर्ण। सकळांचे येक हें प्रमाण ।
जीवमात्रास जाणपण। येकचि असे ॥ १५ ॥
येके दृष्टीचें देखणें। येके जिव्हेचें चाखणें ।
ऐकणें स्पर्शणें वास घेणें। सर्वत्रास येक ॥ १६ ॥
पशु पक्षी किडा मुंगी। जीवमात्र निर्माण जगीं ।
जाणीवकळा सर्वांलागीं। येकचि आहे ॥ १७ ॥
सर्वांस जळ तें सीतळ। सर्वांस अग्नि तेजाळ ।
सर्वांस अंतःकर्ण केवळ। जाणीव कळा ॥ १८ ॥
आवडे नावडे ऐसें जालें। तरी हें देहस्वभावावरी गेलें ।
परंतु हें कळों आलें। अंतःकर्णयोगें ॥ १९ ॥
सर्वांचे अंतःकर्ण येक। ऐसा निश्चयो निश्चयात्मक ।
जाणती याअचें कौतुक। चहुंकडे ॥ २० ॥
इतुकेन फिटली आशंका। आतां अनुमान करूं नका ।
जाणणें तितुकें येका। अंतःकर्णाचें ॥ २१ ॥
जाणोन जीव चारा घेती। जाणोन भिती लपती ।
जाणोनियां पळोन जाती। प्राणीमात्र ॥ २२ ॥
किडामुंगीपासून ब्रह्मादिक। समस्तां अंतःकर्ण येक ।
ये गोष्टीचें कौतुक। प्रत्यें जाणावें ॥ २३ ॥
थोर लहान तरी अग्नी। थोडें बहु तरी पाणी ।
न्यून पूर्ण तरी प्राणी। अंतःकर्णें जाणती ॥ २४ ॥
कोठें उणें कोठें अधीक। परंतु जिनसमासला येक ।
जंगम प्राणी कोणीयेक। जाटिल्याविण नाहीं ॥ २५ ॥
जाणीव म्हणिजे अंतःकर्ण। अंतःकर्ण विष्णूचा अंश जाण ।
विष्णु करितो पाळण। येणें प्रकारें ॥ २६ ॥
नेणतां प्राणी संव्हारितो। नेणीव तमोगुण बोलिजेतो ।
तमोगुणें रुद्र संव्हारितो। येणें प्रकारें ॥ २७ ॥
कांही जाणीव कांही नेणीव। हा रजोगुणाचा स्वभाव ।
जाणतां नेणतां जीव। जन्मास येती ॥ २८ ॥
जाणीवेनें होतें सुख। नेणीवेनें होतें दुःख ।
सुखदुःख अवश्यक। उत्पत्तिगुणें ॥ २९ ॥
जाणण्यानेणण्याची बुद्धि। तोंचि देहीं जाणावा विधी ।
स्थोओळ देहीं ब्रह्मा त्रिशुद्धि। उत्पत्तिकर्ता ॥ ३० ॥
ऐसा उत्पत्ति स्थिति संहार। प्रसंगें बोलिला विचार ।
परंतु याचा निर्धार। प्रत्यें पाहावा ॥ ३१ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
अंतःकर्णयेकनाम समास पहिला ॥

---

समास दुसरा। :। देहआशंकानिरूपण
। । । । ॥ श्रीराम ॥
स्वामीनें विचार दखविला। येथें विष्णूचा अभाव दिसोन आला ।
ब्रह्मा विष्णु महेशाला। उरी नाहीं ॥ १ ॥
उप्तत्ति स्थिति संव्हार। ब्रह्मा विष्णु महेश्वर ।
याचा पाहातां विचार। प्रत्ययो नाहीं ॥ २ ॥
ब्रह्मा उत्पत्तिकर्ता चौमुखांचा। येथें प्रत्ययो नाहीं त्याचा ।
पाळणकर्ता विष्णु चौभुजांचा। तो हि ऐकोन जाणों ॥ ३ ॥

महेश संव्हार करितो। हाहि प्रत्यय कैसा येतो ।
लिंगमहिमा पुराणीं तो। विपरीत बोलिला ॥ ४॥
मूळमायेस कोणें केलें। हें तों पाहिजे कळलें ।
तिहीं देवांचें रूप जालें। ऐलिकडे ॥ ५॥
मूळमाया लोकजननी। तयेपासून गुणक्षोभिणी ।
गुणक्षोभिणीपासून त्रिगुणी। जन्म देवा ॥ ६॥
ऐसें बोलती शास्त्रकारक। आणि प्रवृत्तीचेहि लोक ।
प्रत्ययें पुसतां कित्येक। अकांत करिती ॥ ७॥
म्हणोन त्यास पुसावेना। त्यांचेन प्रत्ययो आणवेना ।
प्रत्ययेंविण प्रेत्न नाना। ठकाठकी ॥ ८॥
प्रचितवीण वैद्य म्हणवी। उगीच करी उठाठेवी ।
तया मुर्खाला गोवी। प्राणीमात्र ॥ ९॥
तैसाच हाहि विचार। प्रत्यये करावा निर्धार ।
प्रत्ययें नस्तां अंधकार। गुरुशिष्यांसी ॥ १०॥
बरें लोकास काये म्हणावें। लोक म्हणती तेंचि बरवें ।
परंतु स्वामीनें सांगावें। विशद करुनी ॥ ११॥
म्हणों देवीं माया केली। तरी देवांचीं रूपें मायेंत आलीं ।
जरी म्हणों मायेनें माया केली। तरी दुसरी नाहीं ॥ १२॥
जरी म्हणो भूतीं केली। तरी ते भूतांचीच वळली ।
म्हणावें जरी परब्रह्में केली। तरी ब्रह्मीं कर्तुत्व नाहीं ॥ १३॥
आणी माया खरी असावी। तरी ब्रह्मीं कर्तुत्वाची गोवी ।
माया मिथ्या ऐसी जाणावी। तरी कर्तुत्व कैंचें ॥ १४॥
आतां हें अवघेंचि उगवें। आणी मनास प्रत्यये फावे ।
ऐसें केलें पाहिजें देवें। कृपाळूपणें ॥ १५॥
वेद मातृकावीण नाहीं। मातृका देहावीण नाहीं ।
देह निर्माण होत नाहीं। देहावेगळा ॥ १६॥
तया देहामधें नरदेहो। त्या नरदेहांत ब्राह्मणदेहो ।
तया ब्राह्मणदेहास पाहो। अधिकार वेदीं ॥ १७॥
असो वेद कोठून जाले। देह कासयाचे केले ।
दैव कैसे प्रगटले। कोण्या प्रकरें ॥ १८॥
ऐसा बळावया अनुमान। केलें पाहिजे समाधान ।
वक्ता म्हणे सावधान। होई आता। १९॥
प्रत्यये पाहातां सांकडी। अवघी होते विघडाविघडी ।
अनुमानितां घडीनें घडी। काळ जातो ॥ २०॥
लोकधाटी शास्त्रनिर्णये। येथें बहुधा निश्चये ।
म्हणोनियां येक प्रत्यये। येणार नाहीं ॥ २१॥
आतां शास्त्राची भीड धरावी। तरी सुटेना हे गथागोवी ।
गथागोवी हे उगवावी। तरी शास्त्रभेद दिसे ॥ २२॥
शास्त्र रक्षून प्रत्यये आणिला। पूर्वपक्ष त्यागून सिद्धांत पाहिला ।
शहाणा मुर्ख समजाविला। येका वचनें ॥ २३॥
शास्त्रींच पूर्वपक्ष बोलिला। पूर्वपक्ष म्हणावें लटक्याला ।
विचार पाहातां आम्हांला। शब्द नाहीं ॥ २४॥
तथापि बोलों कांहींयेक। शास्त्र रक्षून कौतुक ।
श्रोतीं सादर विवेक। केला पाहिजे ॥ २५॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
देहआशंकानाम समास दुसरा ॥

---

समास तिसरा। :। देहआशंकाशोधन
। । । । ॥ श्रीराम ॥
उपाधिविण जें आकाश। तेंचि ब्रह्म निराभास ।
तें निराभासीं मूळमायेस। जन्म जाला ॥ १॥
तें मूळमायेचे लक्षण। वायोस्वरूपचि जाण ।
पंचभूतें आणी त्रिगुण। वायोआंगीं ॥ २॥
आकाशापासून वायो जाला। तो वायोदेव बोलिला ।
वायोपासून अग्नि जाला। तो अग्निदेव ॥ ३॥
अग्निपासून जालें आप। तें नारायणाचें स्वरूप ।
आपापासून पृथ्वीचें रूप। तें बीजाकारें ॥ ४॥
ते पृथ्वीचे पोटीं पाषाण। बहु देवांचें लक्षण ।
नाना प्रचित प्रमाण। पाषाणदेवीं ॥ ५॥
नाना वृक्ष मृत्तिका। प्रचित रोकडी विश्वलोकां ।
समस्त देवांचा थारा येका। वायोमध्यें ॥ ६॥
देव यक्षिणी कात्यायेणी। चामुंडा जखिणी मानविणी ।
नाना शक्ति नाना स्थानीं। देशपरत्वें ॥ ७॥
पुरुषनामें कित्येक। देव असती अनेक ।
भूतें देवतें नपुषक। नामें बोलिजेती ॥ ८॥
देव देवतांदेवतेंभूतें। पृथ्वीमध्यें असंख्यातें ।
परंतु यां समस्तांतें। वायोस्वरूप बोलिजे ॥ ९॥
वायोस्वरूप सदा असणें। प्रसंगें नाना देह धरणें ।
गुप्त प्रगट होणें जाणें। समस्तांसी ॥ १०॥
वायोस्वरूपें विचरती। वायोमध्यें जगज्जोती ।
जाणीवकळा वासना वृत्ति। नाना भेदें ॥ ११॥
आकाशापासून वायो जाला। तो दों प्रकारें विभागला ।
सावधपणें विचार केला। पाहिजे श्रोतीं ॥ १२॥
येक वारा सकळ जणती। येक वायोमधील जगज्जोती ।
जगज्जोतीच्या अनंत मूर्ती। देवदेवतांच्या ॥ १३॥
वायो बहुत विकारला। परंतु दों प्रकारें विभागला ।
आतां विचार ऐकिला। पाहिजे तेजाचा ॥ १४॥
वायोपाऊन तेज जालें। उष्ण सीतळ प्रकाशलें ।
द्विविध रूप ऐकिलें। पाहिजें तेजाचें ॥ १५॥
उष्णापासून जाला भानु। प्रकाशरूप दैदीप्यमानु ।
सर्वभक्षक हुताशनु। आणी विद्युल्यता ॥ १६॥
सीतळापासून आप अमृत। चंद्र तारा आणी सीत ।
आतां परिसा सावचित्त। होऊन श्रोते ॥ १७॥
तेज बहुत विकारलें। परंतु द्विविधाच बोलिलें ।
आपहि द्विविधाच निरोपिलें। आप आणि अमृत ॥ १८॥
ऐकें पृथ्वीचा विचार। पाषाण मृत्तिका निरंतर ।
आणीक दुसरा प्रकार। सुवर्ण परीस नाना रत्नें ॥ १९॥

बहुरत्ना वसुंधरा। कोण खोटा कोण खरा ।
अवघें कळे विचारास। रूढ होतां ॥ २०॥
मनुष्यें कोठून जालीं। हे मुख्य आशंका राहिली ।
पुढें वृत्ति सावध केली। पाहिजे श्रोतीं ॥ २१॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
देहआशंकाशोधननाम समास तिसरा ॥

---

समास चवथा। :। बीजलक्षण
। । । । ॥ श्रीराम ॥
आतां पाहों जातां उत्पत्ति। मनुष्यापासून मनुष्यें होती ।
पशुपासून पशु निपजती। प्रत्यक्ष आतां ॥ १॥
खेंचरें आणी भूचरें। वनचरें आणी जळचरें ।
नाना प्रकारींचीं शरीरें। शरीरांपासून होती ॥ २॥
प्रत्ययास आणी प्रमाण। निश्चयास आणी अनुमान ।
मार्ग देखोन आडरान। घेऊंच नये ॥ ३॥
विपरीतपासून विपरीतें होती। परी शरीरेंच बोलिजेती ।
शरीरावांचून उत्पत्ती। होणार नाहीं ॥ ४॥
तरी हे उत्पत्ति कैसी जाली। कासयाची कोणें केली ।
जेणें केली त्याची निर्मिली। काया कोणें ॥ ५॥
ऐसें पाहातां उदंड लांबलें। परी मुळीं शेरीर जैसें जालें ।
कासयाचें उभारिलें। कोणें कैसें ॥ ६॥
ऐसी हे मागील आशंका। राहात गेली ते ऐका ।
कदापी जाजु घेऊं नका। प्रत्ययो आलियानें ॥ ७॥
प्रत्ययोचि आहे प्रमाण। मूर्खास वाटे अप्रमाण ।
पिंडें प्रचितशब्दें जाण। विश्वासासी ॥ ८॥
ब्रह्मीं मूळमाया जाली। तेचि अष्टधा प्रकृती बोलिली ।
भूतीं त्रिगुणीं कालवली। मूळमाया ॥ ९॥
तें मूळमाया वायोस्वरूप। वायोमध्यें जाणीवेचें रूप ।
तेचि इच्छा परी आरोप। ब्रह्मीं न घडे ॥ १०॥
तथापि ब्रह्मीं कल्पिला। तरी तो शब्द वायां गेला ।
आत्मा निर्गुण संचला। शब्दातीत ॥ ११॥
आत्मा निर्गुण वस्तु ब्रह्म। नाममात्र तितुका भ्रम ।
कल्पून लाविला संभ्रम। तरी तो लागणार नाहीं ॥ १२॥
तथापि आग्रहें लाविला। जरी धोंडा मारिला आकाशाला ।
आकाशावरी थुंकिला। तरी तें तुटेना ॥ १३॥
तैसें ब्रह्म निर्विकार। निर्विकारीं लाविती विकार ।
विकार नासे निर्विकार। जैसें तैसें ॥ १४॥
आतां ऐका प्रत्ययो। जाणोनि धरावा निश्चयो ।
तरीच पाविजे जयो। अनुभवाचा ॥ १५॥
मायाब्रह्मीं जो समीर। त्यांत जाणता तो ईश्वर ।
ईश्वर आणि सर्वेश्वर। तयासीच बोलिजे ॥ १६॥
तोचि ईश्वर गुणासी आला। त्याचा त्रिगुणभेद जाला ।
ब्रह्मा विष्णु महेश उपजला। तये ठाईं ॥ १७॥
सत्व रज आणी तम। हे त्रिगुण उत्तमोत्तम ।
यांच्या स्वरूपाचा अनुक्रम। मागां निरोपिला ॥ १८॥
जाणता विष्णु भगवान। जाणता नेणता चतुरानन ।
नेणता महेश पंचानन। अत्यंत भोळा ॥ १९॥
त्रिगुण त्रिगुणीं कालवले। कैसे होती वेगळाले ।
परी विशेष न्यून भासले। ते बोलावे लागती ॥ २०॥
वायोमध्यें विष्णु होता। तो वायोस्वरूपचि तत्वता ।
पुढें जाला देहधर्ता। चतुर्भुज ॥ २१॥
तैसाच ब्रह्मा आणी महेश। देह धरिती सावकास ।
गुप्त प्रगट होतां तयास। वेळ नाहीं ॥ २२॥
आतां रोकडी प्रचिती। मनुष्यें गुप्त प्रगटती ।
मां त्या देवांच्याच मूर्ती। सामर्थ्यवंत ॥ २३॥
देव देवता भूतें देवतें। चढतें सामर्थ्य तेथें ।
येणेंचि न्यायें राक्षसांतें। सामर्थ्यकळा ॥ २४॥
झोटींग वायोस्वरूप असती। सवेंच खुळखुळां चालती ।
खोबरीं खारिका टाकून देती। अकस्मात ॥ २५॥
अवघेंचि न्याल अभावें। तरी तें बहुतेकांस ठावें ।
आपुल्याला अनुभवें। विश्वलोक जाणती ॥ २६॥
मनुष्यें धरती शरीरवेष। नाना परकाया प्रवेश ।
मां तो परमात्मा जगदीश। कैसा न धरी ॥ २७॥
म्हणोनि वायोस्वरूपें देह धरिलें। ब्रह्मा विष्णु महेश जालें ।
पुढें तेचि विस्तारलें। पुत्रपौत्रीं ॥ २८॥
अंतरींच स्त्रिया कल्पिल्या। तों त्या कल्पितांच निर्माण जाल्या ।
परी तयापासून प्रजा निर्मिल्या। नाहींत कदा ॥ २९॥
इछून पुत्र कल्पिले। ते ते प्रसंगीं निर्माण जाले ।
येणें प्रकारें वर्तले। हरिहरादिक ॥ ३०॥
पुढें ब्रह्मयानें सृष्टी कल्पिली। इछेसरिसी सृष्टी जाली ।
जीवसृष्टि निर्माण केली। ब्रह्मदेवें ॥ ३१॥
नाना प्रकारीचे प्राणी कल्पिले। इछेसरिसे निर्माण जाले ।
अवघे जोडेचि उदेले। अंडजजारजादिक ॥ ३२॥
येक जळस्वेदापासून जाले। ते प्राणी स्वेदज बोलिले ।
येक वायोकरितां जाले। अकस्मात उद्भिज ॥ ३३॥
मनुष्याची गौडविद्या। राक्षसांची वोडंबरी विद्या ।
ब्रह्मयाची सृष्टिविद्या। येणें प्रकरें ॥ ३४॥
कांहीयेक मनुष्यांची। त्याहून विशेष राक्षसांची ।
त्याहून विशेष ब्रह्मयाची। सृष्टिविद्या ॥ ३५॥
जाणते नेणते प्राणी निर्मिले। वेद वदोन मार्ग लाविले ।
ब्रह्मयानें निर्माण केले। येणें प्रकारें ॥ ३६॥
मग शरीपासून शरीरें। सृष्टी वाढली विकारें ।
सकळ शरीरें येणें प्रकारें। निर्माण जाली ॥ ३७॥
येथें आशंका फिटली। सकळ सृष्टी विस्तारली ।
विचार पाहातं प्रत्यया आली। येथान्वयें ॥ ३८॥
ऐसी सृष्टी निर्माण केली। पुढें विष्णुनें कैसी प्रतिपाळिली ।
हेहि विवंचना पाहिली। पाहिजे श्रोतीं ॥ ३९॥

सकळ प्राणी निर्माण जाले। ते मूळरूपें जाणोन पाळिले ।
शरीरें दैत्य निर्दाळिले। नाना प्रकारींचे ॥ ४०॥
नाना अवतार धरणें। दुष्टांचा संहार करणें ।
धर्म स्थापायाकारणें। विष्णुस जन्म ॥ ४१॥
म्हणोन धर्मस्थापनेचे नर। तेंहि विष्णुचे अवतार ।
अभक्त दुर्जन रजनीचर। सहजचि जाले ॥ ४२॥
आतां प्राणी जे जन्मले। ते नेणोन संव्हारिले ।
मूळरूपें संव्हारिलें। येणें प्रकारें ॥ ४३॥
शरीरें रुद्र खवळेल। तैं जीवसृष्टि संव्हारेल ।
अवघें ब्रह्मांडचि जळेल। संव्हारकाळीं ॥ ४४॥
एवं उत्पत्ति स्थिती संव्हार। याचा ऐसा आहे विचार ।
श्रोतीं होऊन तत्पर। अवधान द्यावें ॥ ४५॥
कल्पांतीं संव्हार घडेल। तोचि पुढें सांगिजेल ।
पंचप्रळय वोळखेल। तोचि ज्ञानी ॥ ४६॥

---

समास पांचवा। :। प/न्चप्रळयनिरूपण
। । । । ॥ श्रीराम ॥
ऐका प्रळयाचें लक्षण। पिंडीं दोनी प्रळये जाण ।
येकनिद्रा येक मरण। देहांतकाळ ॥ १॥
देहाधारक तिनी मूर्ती। निद्रा जेव्हां संपादिती ।
तो निद्राप्रळय श्रोतीं। ब्रह्मांडींचा जाणावा ॥ २॥
तिनी मूर्तीस होईल अंत। ब्रह्मांडास मांडेल कल्पांत ।
तेव्हां जाणावा नेमस्त। ब्रह्मप्रळये जाला ॥ ३॥
दोनी पिंडीं दोनी ब्रह्मांडीं। च्यारी प्रळय नवखंडीं ।
पांचवा प्रळय उदंडी। जाणिजे विवेकाचा ॥ ४॥
ऐसे हे पांचहि प्रळये। सांगितले येथान्वयें ।
आतां हें अनुभवास ये। ऐसें करूं ॥ ५॥
निद्रा जेव्हां संचरे। तेव्हां जागृतीव्यापार सरे ।
सुषुप्ति अथवा स्वप्न भरे। अकस्मात आअंगीं ॥ ६॥
या नांव निद्राप्रळये। जागृतीचा होये क्षये ।
आतां ऐका देहांतसमये। म्हणिजे मृत्युप्रळये ॥ ७॥
देहीं रोग बळावती। अथवा कठीण प्रसंग पडती ।
तेणें पंचप्राण जाती। व्यापार सांडुनी ॥ ८॥
तिकडे गेला मनपवनु। इकडे राहीली नुस्ती तनु ।
दुसरा प्रळयो अनुमानु। असेचिना ॥ ९॥
तिसरा ब्रह्मा निजेला। तों हा मृत्यलोक गोळा जाला ।
अवघा व्यापार खुंटला। प्राणीमात्रांचा ॥ १०॥
तेव्हां प्राणीयांचे सुक्ष्मांश। वायोचक्रीं करिती वास ।
कित्येक काल जातां ब्रह्मयास। जागृती घडे ॥ ११॥
पुन्हा मागुती सृष्टि रची। विसंचिले जीव मागुतें संची ।
सीमा होतां आयुष्याची। ब्रह्मप्रळय मांडे ॥ १२॥
शत वरुषें मेघ जाती। तेणें प्राणी मृत्यु पावती ।
असंभाव्य तर्के क्षिती। मर्यादेवेगळी ॥ १३॥
सूर्य तपे बाराकळी। तेणें पृथ्वीची होय होळी ।
अग्नी पावतां पाताळीं। शेष विष वमी ॥ १४॥
आकाशीं सूर्याच्या ज्वाळा। पाताळीं शेष विष वमी गरळा ।
दोहिकडून जळतां भूगोळा। उरी कैंची ॥ १५॥
सूर्यास खडतरता चढे। हलकालोळ चहुंकडे ।
कोंसळती मेरूचे कडे। घडघडायमान ॥ १६॥
अमरावती सत्यलोक। वैकुंठ कैळासादिक ।
याहिवेगळे नाना लोक। भस्मोन जाती ॥ १७॥
मेरु अवघाचि घसरे। तेथील महीमाच वोसरे ।
देवसमुदाव वावरे। वायोचक्रीं ॥ १८॥
भस्म जालिया धरत्री। प्रजन्य पडें शुंडाधारीं ।
मही विरे जळांतरीं। निमिष्यमात्रें ॥ १९॥
पुढें नुस्ते उरेल जळ। तयास शोषील अनळ ।
पुढें एकवटती ज्वाळ। मर्यादेवेगळे ॥ २०॥
समुद्रींचा वडवानळ। शिवनेत्रींचा नेत्रानळ ।
सप्तकंचुकींचा आवर्णानळ। सूर्य आणी विद्युल्यता ॥ २१॥
ऐसे ज्वाळ एकवटती। तेणें देव देह सोडिती ।
पूर्वरूपें मिळोन जाती। प्रभंजनीं ॥ २२॥
तो वारा झडपी वैश्वानरा। वन्ही विझेल येकसरा ।
वायो धावें सैरावैरा। परब्रह्मीं ॥ २३॥
धूम्र वितुळे आकाशीं। तैसे होईल समीरासी ।
वहुतां मधें थोडियासी। नाश बोलिला ॥ २४॥
वायो वितुळतांच जाण। सूक्ष्म भूतें आणी त्रिगुण ।
ईश्वर सांडी अधिष्ठान। निर्विकल्पीं ॥ २५॥
तेथें जाणिव राहिली। आणी जगज्जोती निमाली ।
शुद्ध सारांश उरली। स्वरूपस्थिती ॥ २६॥
जितुकीं काहीं नामाभिधानें। तये प्रकृतीचेनि गुणें ।
प्रकृती नस्तां बोलणें। कैसें बोलावें ॥ २७॥
प्रकृती अस्तां विवेक कीजे। त्यास विवेकप्रळये बोलिजे ।
पांचहि प्रळय वोजें। तुज निरोपिलें ॥ २८॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
पंचप्रळयनिरूपणनाम समास पांचवा ॥

---

समास सहावा। :। भ्रम्निरूपण
। । । । ॥ श्रीराम ॥
उत्पत्ति स्थिति संव्हार। याचा निरोपिला वेव्हार ।
परमात्मा निर्गुण निराकार। जैसा तैसा ॥ १॥
होतें वर्ततें आणि जातें। याचा समंध नाहीं तेथें ।
आद्य मद्य अवसान तें। संचलेंचि आहे ॥ २॥
परब्रह्म असतचि असे। मध्येंचि हा भ्रम भासे ।
भासे परंतु अवघा नासे। काळांतरी ॥ ३॥
उत्पत्तिस्थितीसंव्हारत। मध्येंहि अखंड होत जात ।
पुढें सेवटीं कल्पांत। सकळांस आहे ॥ ४॥
यामधें ज्यास विवेक आहे। तो आधींच जाणताहे ।
सारासार विचारें पाहे। म्हणौनियां ॥ ५॥

बहुत भ्रमिष्ट मिळाले। त्यांत उमजल्याचें काय चाले ।
सृष्टिमधें उमजले। ऐसें थोडे ॥ ६ ॥
त्या उमजल्यांचे लक्षण। कांहीं करूं निरूपण ।
ब्रम्हाहून विलक्षण। महापुरुष ॥ ७ ॥
भ्रम हा नसेल जयासी। मनीं वोळखावे तयासी ।
ऐके आतां भ्रमासीं। निरोपिजेल ॥ ८ ॥
येक परब्रह्म संचलें। कदापी नाहीं विकारले ।
त्यावेगळें भासलें। तें भ्रमरूप ॥ ९ ॥
जयासी बोलिला कल्पांत। त्रिगुण आणि पंचभूत ।
हें अवघेंचि समस्त। भ्रमरूप ॥ १० ॥
मी तूं हा भ्रम। उपासनाहि भ्रम ।
ईश्वरभाव हाहि भ्रम। निश्चयेंसीं ॥ ११ ॥

॥ श्लोक ॥
भ्रमेणाहं भ्रमेण त्वं। भ्रमेणोपासका जनाः ।
भ्रमेणेश्वर भावत्वं। भ्रममूलमिदं जगत् ॥ १ ॥

याकारणें सृष्टि भासत। परंतु भ्रमचि हा समस्त ।
यामध्यें जे विचारवंत। तेचि धन्य ॥ १२ ॥
आतां भ्रमाचा विचारु। अत्यंतचि प्रांजळ करूं ।
दृष्टांतद्वारे विवरूं। श्रोतयासी ॥ १३ ॥
भ्रमण करीतां दुरीं देसीं। दिशाभूली आपणासी ।
कां वोळखी मोडे जीवलगांसी। या नांव भ्रम ॥ १४ ॥
कां उन्मत्त द्रव्य सेविलें। तेणें अनेक भासों लागलें ।
नाना वेथां कां झडपिलें। भुतें तो भ्रम ॥ १५ ॥
दशावतारीं वाटती नारी। कां ते मांडली बाजीगरी ।
उगाच संदेह अंतरीं। या नांव भ्रम ॥ १६ ॥
ठेविला ठाव तो विसरला। कां मार्गी जातां मार्ग चुकला ।
पट्टणामधें भांबावला। या नांव भ्रम ॥ १७ ॥
वस्तु आपणापासीं असतां। गेली म्हणोनि होये दुचिता ।
आपलें आपण विसरतां। या नांव भ्रम ॥ १८ ॥
कांही पदार्थ विसरोन गेला। कां जें सिकला तें विसरला ।
स्वप्नदुःखें घाबिरा जाला। या नांव भ्रम ॥ १९ ॥
दुश्चिन्हें अथवा अपशकुन। मिथ्या वार्तेनें भंगे मन ।
वचके पदार्थ देखोन। या नांव भ्रम ॥ २० ॥
वृक्ष काष्ठ देखिलें। मनांत वाटें भूत आलें ।
कांहींच नस्तां हडबडिलें। या नांव भ्रम २१ ॥
काच देखोन उदकांत पडे। कां सभा देखोन दर्पणीं पवाडे ।
द्वार चुकोन भल्तीकडें जाणें या नांव भ्रम ॥ २२ ॥
येक अस्तां येक वाटे। येक सांगतां येक निवटे ।
येक दिसतां येक उठे। या नांव भ्रम ॥ २३ ॥
आतां जें जें देइजेतें। तें तें पुढें पाविजेतें ।
मेलें माणुस भोजना येतें। या नांव भ्रम ॥ २४ ॥
ये जन्मींचें पुढिले जन्मीं। कांहीं येक पावेन मी ।
प्रीतीगुंतली मनुष्याचे नामीं। या नांव भ्रम ॥ २५ ॥
मेलें मनुष्य स्वप्ना आलें। तेणें कांहीं मागितलें ।
मनीं अखंड बैसलें। यानांव भ्रम ॥ २६ ॥
अवघें मिथ्या म्हणोन बोले। आणि समर्थावरी मन चाले ।
ज्ञाते वैभवें दपटले। या नांव भ्रम ॥ २७ ॥
कर्मठपणें ज्ञान विटे। कां ज्ञातेपणें बळें भ्रष्टे ।
कोणीयेक सीमा फिटे। या नांव भ्रम ॥ २८ ॥
देहाभिमान। कर्माभिमान जात्याभिमान कुळाभिमान ।
ज्ञानाभिमान मोक्षाभिमान। या नांव भ्रम ॥ २९ ॥
कैसा न्याय तो न कळे। केला अन्याने तो नाडले ।
उगाच अभिमानें खवळे। या नांव भ्रम ॥ ३० ॥
मागील कांही आठवेना। पुढील विचार सुचेना ।
अखंड आरूढ अनुमाना। या नांव भ्रम ॥ ३१ ॥
प्रचीतिविण औषध घेणे। प्रचित नस्ता पथ्य करणे ।
प्रचीतीविण ज्ञान सांगणें। या नांव भ्रम ॥ ३२ ॥
फळश्रुतीवीण प्रयोग। ज्ञानेंवीण नुस्ता योग ।
उगाच शरीरें भोगिजे भोग। या नांव भ्रम ॥ ३३ ॥
ब्रह्मा लिहितो अदृष्टीं आणि वाचून जाते सटी ।
ऐशा प्रकारीच्या गोष्टी। या नांव भ्रम ॥ ३४ ॥
उदंड भ्रम विसरला। अज्ञानजनीं पैसावला ।
अल्प संकेतें बोलिला। कळावया कारणें ॥ ३५ ॥
भ्रमरूप विश्व स्वभावें। तेथें काये म्हणोन सांगावें ।
निर्गुण ब्रह्मावेगळें अघवें। भ्रमरूप ॥ ३६ ॥
ज्ञातास नाहीं संसार। ऐसें बोलती अपार ।
गत ज्ञात्याचे चमत्कार। या नांव भ्रम ॥ ३७ ॥
येथें आशंका उठिली। ज्ञात्याची समधी पूजिली ।
तेथें कांहीं प्रचीत आली। किंवा नाहीं ॥ ३८ ॥
तैसेचि अवतारी संपले। त्यांचेहि सामर्थ्य उदंड चाले ।
तरी ते काये गुंतले। वासना धरूनि ॥ ३९ ॥
ऐसी आशंका उद्भवली। समर्थें पाहिजे निरसिली ।
इतुकेन हे समाप्त जाली। कथा भ्रमाची ॥ ४० ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
भ्रमनिरूपणनाम समास सहावा ॥

---

समास सातवा। :। सगुणभजन
। । । । ॥ श्रीराम ॥
अवतारादिक ज्ञानी संत। सारासारविचारें मुक्त ।
त्यांचे सामर्थ्य चालत। कोण्या प्रकारें ॥ १ ॥
हें श्रोतयांची आशंका। पाहातां प्रश्न केला निका ।
सावध होऊन ऐका। म्हणे वक्ता ॥ २ ॥
ज्ञानी मुक्त होऊन गेले। मागें त्यांचे सामर्थ्य चाले ।
परंतु ते नाहीं आले। वासना धरूनी ॥ ३ ॥
लोकांस होतो चमत्कार। लोक मानिती साचार ।

परंतु याचा विचार। पाहिला पाहिजे ॥ ४॥
जीत अस्तां नेणों किती। जनामधें चमत्कार होती ।
ऐसियाची सद्य प्रचिती। रोकडी पाहावी ॥ ५॥
तो तरी आपण नाहीं गेला। लोकीं प्रत्यक्ष देखिला ।
ऐसा चमत्कार जाला। यास काये म्हणावें ॥ ६॥
तरी तो लोकांचा भावार्थ। भाविकां देव येथार्थ ।
अनेत्र कल्पना वेर्थ। कुतर्कांची ॥ ७॥
आवडे तें स्वप्नीं देखिलें। तरीकाय तेथून आलें ।
म्हणाल तेणें आठविलें। तरी द्रव्य कां दिसे ॥ ८॥
एवं आपली कल्पना। स्वप्नीं येती पदार्थ नाना ।
परी ते पदार्थ चालतीना। अथवा आठऊ नाहीं ॥ ९॥
येथें तुटली आशंका। ज्ञात्यास जन्म कल्पूं नका ।
उमजेना तरी विवेका। बरें पाहा ॥ १०॥
ज्ञानी मुक्त होऊन गेले। त्यांचें सामर्थ्य उगेचि चाले ।
कां जे पुण्यमार्गें चालिलें। म्हणोनियां ॥ ११॥
याकारणें पुण्यमार्गें चालावें। भजन देवाचें वाढवावें ।
न्याये सांडून न जावें। अन्यायमार्गें ॥ १२॥
नानापुरश्चरणें करावीं। नाना तीर्थाटणें फीरावीं ।
नाना सामर्थ्यें वाढवावीं। वैराग्यबळें ॥ १३॥
निश्चये बैसे वस्तूकडे। तरी ज्ञानमार्गेंहि सामर्थ्य चढे ।
कोणीयेक येकांत मोडे। ऐसें न करावें ॥ १४॥
येक गुरु येक देव। कोठें तरी असावा भाव ।
भावार्थ नस्तां वाव। सर्व कांहीं ॥ १५॥
निर्गुणीं ज्ञान जालें। म्हणोन सगुण अलक्ष केलें ।
तरी तें ज्ञातें नागवलें। दोहिंकडे ॥ १६॥
नाहीं भक्ती नाहीं ज्ञान। मधेंच पैसावला अभिमान ।
म्हणोनियां जपध्यान। सांडूंच नये ॥ १७॥
सांडील सगुणभजनासी। तरी तो ज्ञाता परी अपेसी ।
म्हणोनियां सगुणभजनासी। सांडूंच नये ॥ १८॥
निःकाम बुद्धीचिया भजना। त्रैलोकीं नाहीं तुळणा ।
समर्थेंविण घडेना। निःकाम भजन ॥ १९॥
कामनेनें फळ घडे। निःकाम भजनें भगवंत जोडे ।
फळभगवंता कोणीकडे। महदांतर ॥ २०॥
नाना फळे देवापासी। आणी फळ अंतरीं भगवंतासी ।
याकारणें परमेश्वरासी। निःकाम भजावें ॥ २१॥
निःकामभजनाचें फळ आगळे। सामर्थ्य चढे मर्यादावेगळें ।
तेथें बापुडी फळें। कोणीकडे ॥ २२॥
भक्तें जें मनीं धरावें। तें देवें आपणचि करावें ।
तेथें वेगळें भावावें। नलगे कदा ॥ २३॥
दोनी सामर्थ्यें येक होतां। काळास नाटोपे सर्वथा ।
तेथें इतरांसी कोण कथा। कीटकन्यायें ॥ २४॥
म्हणोनि निःकाम भजन। वरी विशेष ब्रह्मज्ञान ।
तयास तुळितां त्रिभुवन। उणें वाटे ॥ २५।
येथें बुद्धीचा प्रकाश। आणिक न चढे विशेष ।
प्रताप कीर्ती आणी येश। निरंतर ॥ २६॥
निरूपणाचा विचार। आणी हरिकथेचा गजर ।
तेथें होती तत्पर। प्राणीमात्र ॥ २७॥
जेथें भ्रष्टाकार घडेना। तो परमार्थहि दडेना ।
समाधान विघडेना। निश्चयाचें ॥ २८॥
सारासारव्हिचार करणें। न्याये अन्याये अखंड पाहाणें ।
बुद्धि भगवंताचें देणें। पालटेना ॥ २९॥
भक्त भगवंतीं अनन्य। त्यासी बुद्धी देतो आपण ।
येदर्थी भगवद्वचन। सावध ऐका ॥ ३०॥
श्लोकार्ध ॥ ददामि बुद्धियोगं तं येन मामुपयांति ते ॥
म्हणौन सगुण भजन। वरी विशेष ब्रह्मज्ञान ।
प्रत्ययाचें समाधान। दुर्ल्लभ जगीं ॥ ३१॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
सगुणभजननिरूपणनाम समास सातवा ॥

---

समास आठवा। :। प्रचीतनिरूपण
। । । । ॥ श्रीराम ॥
ऐका प्रचित्तीचीं लक्षणें। प्रचित पाहेल तें शाहाणें ।
येर वेडे दैन्यवाणे। प्रचितीविण ॥ १॥
नाना रत्नें नाना नाणीं। परीक्षून न घेतां हानी ।
प्रचित न येतां निरूपणीं। बैसोंच नये ॥ २॥
सुरंग शस्त्र दमून पाहिलें। बरें पाहातां प्रचितीस आले ।
तरी मग पाहिजे घेतलें। जाणते पुरुषीं ॥ ३॥
बीज उगवेलसें पाहावें। तरी मग द्रव्य घालून घ्यावें ।
प्रचित आलियां ऐकावें। निरूपण ॥ ४॥
देहीं आरोग्यता जाली। ऐसी जना प्रचित आली ।
तरी मग आगत्य घेतली। पाहिजे मात्रा ॥ ५॥
प्रचितीविण औषध घेणें। तरी मग धडचि विघडणें ।
अनुमानें जें कार्य करणें। तेंचि मुर्खपण ॥ ६॥
प्रचितीस नाहीं आलें। आणि सुवर्ण करविलें ।
तरी मग जाणावें ठकिलें। देखतदेखतां ॥ ७॥
शोधून पाहिल्याविण। कांहींतरी येक कारण ।
होणार नाहीं निर्वाण। प्राणास घडे ॥ ८॥
म्हणोनी अनुमानाचें कार्य। भल्यानीं कदापि करूं नये ।
उपाय पाहतां अपाये। नेमस्त घडे ॥ ९॥
पाण्यांतील म्हैसीची साटी। करणें हें बुद्धिच खोटी ।
शोधिल्याविण हिंपुटी। होणें घडे ॥ १०॥
विश्वासें घर घेतलें। ऐसें किती नाहीं ऐकलें ।
मैंदें मैंदावें केलें। परी तें शोधिलें पाहिजे ॥ ११॥
शोधिल्याविण अन्नवस्त्र घेणें। तेणें प्राणास मुकणें ।
लटिक्याचा विश्वास धरणें। हेंचि मूर्खपण ॥ १२॥
संगती चोराची धरितां। घात होईल तत्वता ।
ठकु सिंतरु शोधितां। ठाई पडे ॥ १३॥

गैरसाळ तामगिरी। कोणी नवी मुद्रा करी ।
नाना कपट परोपरीं। शोधून पाहावें ॥१४॥
दिवाळखोराचा मांड। पाहातां वैभव दिसे उदंड ।
परी तें अवघें थोतांड। भंड पुढें ॥१५॥
तैसें प्रचितीवीण ज्ञान। तेथें नाहीं समाधान ।
करून बहुतांचा अनुमान। अन्हीत जालें ॥ १६॥
मंत्र यंत्र उपदेसिले। नेणतें प्राणी तें गोविलें ।
जैसें झांकून मारिलें। दुखणाईत ॥१७॥
वैद्य पाहिला परी कच्चा। तरी प्राण गेला पोराचा ।
येथें उपाये दुसऱ्याचा। काये चाले ॥१८॥
दुःखें अंतरी झिजे। आणी वैद्य पुसतां लाजे ।
तरीच मग त्यासी साजे। आत्महत्यारेपण ॥१९॥
जाणत्यावरी गर्व केला। तरी नेणत्याकरितां बुडाला ।
येथें कोणाचा घात जाला। बरें पाहा ॥२०॥
पापाची खंडणा जाली। जन्मयातना चुकली ।
ऐसी स्वयें प्रचित आली। म्हणिजे बरें ॥२१॥
परमेश्वरास वोळखिलें। आपण कोणसें कळलें ।
आत्मनिवेदन जालें। म्हणिजे बरें ॥२२॥
ब्रह्मांड कोणें केलें। कासयाचें उभारलें ।
मुख्य कर्त्यास वोळखिलें। म्हणिजे बरें ॥२३॥
येथेंअनुमान राहिला। तरी परमार्थ केला तो वायां गेला ।
प्राणी संशई बुडाला। प्रचितीविण ॥२४॥
हें परमार्थाचें वर्म। लटिकें बोले तो अधम ।
लटिके मानी तो अधमोद्धम। येथार्थ जाणावा ॥२५॥
येथें बोलण्याची जाली सीमा। नेणतां न कळे परमात्मा ।
असत्य नाहीं सर्वोत्तमा। तूं जाणसी ॥२६॥
माझे उपासनेचा बडिवार। ज्ञान सांगावें साचार ।
मिथ्या बोलतां उत्तर। प्रभूस लगे ॥२७॥
म्हणोनि सत्यचि बोलिलें। कर्त्यास पाहिजे वोळखिलें ।
मायोद्भवाचें शोधिलें। पाहिजे मूळ ॥२८॥
तेंचि पुढें नीरूपण। बोलिलेंचि बोलिलें प्रमाण ।
श्रोतीं सावध अंतःकर्ण। घातलेंचि घालावें ॥२९॥
सूक्ष्म निरूपण लागलें। तेथें बोलिलेंचि मागुतें बोलिलें ।
श्रोत्यांस पाहिजे उमजलें ह्मणौनियां ॥३०॥
प्रचित पाहातां निकट। उडोन जाती परिपाठ ।
म्हणोनि हे खटपट। करणें लागे ॥३१॥
परिपाठेंचि जरी बोलिलें। तरी प्रचितसमाधान बुडालें ।
प्रचितसमाधान राखिलें। तरी परिपाठ उडे ॥३२॥
ऐसी सांकडी दोहींकडे। म्हणौन बोलिलेंचि बोलणें घडे ।
दोनी राखोनियां कोडें। उकलोओन दाऊं ३३॥
परीपाठ आणी प्रचित प्रमाण। दोनी राखोन निरूपण ।
श्रोते परम विचक्षण। विवरोत पुढें ॥३४॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
प्रचितनिरूपणनाम समास आठवा ॥

---

समास नववा। :। पुरुषप्रकृति
। । । । ॥श्रीराम ॥
आकाशीं वायो जाला निर्माण। तैसी ब्रह्मीं मूळमाया जाण ।
त्या वायोमधें त्रिगुण। आणी पंचभूतें ॥१॥
वटबीजीं असे वाड। फोडून पाहातां न दिसे झाड ।
नाना वृक्षांचे जुंबाड। बीजापासून होती ॥२॥
तैसी बीजरूप मुळमाया। विस्तार जाला तेथुनियां ।
तिचें स्वरूप शोधुनियां। बरें पाहावें ॥३॥
तेथें दोनी भेद दिसती। विवेकें पाहावी प्रचिती ।
निश्चळीं जे चंचळ स्थिती। तोचि वायो ॥४॥
तयामधें जाणीवकळा। जगज्जोतीचा जिव्हाळा ।
वायो जाणीव मिळोन मेळा। मूळमाया बोलिजे ॥५॥
सरिता म्हणतां बायको भासे। तेथें पाहातां पाणीच असे ।
विवेकी हो समजा तैसें। मूळमायेसी ॥६॥
वायो जाणीव जगज्जोती। तयास मूळमाया म्हणती ।
पुरुष आणी प्रकृती। याचेंच नांव ॥७॥
वायोस म्हणती प्रकृती। आणी पुरुष म्हणती जगज्जोती ।
पुरुषप्रकृती शिवशक्ती। याचेंच नांव ॥८॥
वायोमधें जाणीव विशेष। तेंचि प्रकृतुमधें पुरुष ।
ये गोष्टीचा विश्वास। धरिला पाहिजे ॥९॥
वायो शक्ति जाणीव ईश्वर। अर्धनारी नटेश्वर ।
लोक म्हणती निरंतर। येणें प्रकारें ॥१०॥
वायोमधें जाणीव गुण। तेंचि ईश्वराचें लक्षण ।
तयापासून त्रिगुण। पुढें जाले ॥११॥
तया गुणामधें सत्वगुण। निखळ जाणीवलक्षण ।
त्याचा देहधारी आपण। विष्णु जाला ॥१२॥
त्याच्या अंशे जग चाले। ऐसे भगवद्गीता बोले ।
गुंतले तेंचि उगवले। विचार पाहातां ॥१३॥
येक जाणीव वांटली। प्राणीमात्रास विभागली ।
जाणजाणों वांचविली। सर्वत्र काया ॥१४॥
तयेंचे नांव जगज्जोती। प्राणीमात्र तिचेन जिती ।
याची रोकडी प्रचिती। प्रत्यक्ष पाहावी ॥१५॥
पक्षी श्वापद किडा मुंगी। कोणीयेक प्राणी जगीं ।
जाणीव खेळे त्याच्या आंगीं। निरंतर ॥१६॥
जाणोनी काया पळविती। तेणें गुणें वांचती ।
दडती आणि लपती। जाणजाणों ॥१७॥
आवघ्या जगस वांचविती। म्हणोन नामें जगज्जोती ।
ते गेलियां प्राणी मरती। जेथील तेथें ॥१८॥
मुळींचे जाणीवेचा विकार। पुढें जाला विस्तार ।
जैसे उदकाचे तुषार। अनंत रेणु ॥१९॥
तैसे देव देवता भूतें। मिथ्या म्हणोनये त्यांतें ।
आपलाल्या सामर्थ्यें ते। सृष्टीमधें फिरती ॥२०॥

सदा विचरती वायोस्वरूपें। स्वइछा पालटिती रूपें ।
अज्ञान प्राणी भ्रमें संकल्पें त्यास। बाधिती ॥ २१॥
ज्ञात्यास संकल्पेचि असेना। म्हणोन त्यांचेन बाधवेना ।
याकारणें आत्मज्ञाना। अभ्यासावें ॥ २२॥
अभ्यासिलिया आत्मज्ञान। सर्वकर्मास होये खंडण ।
हे रोकडी प्रचित प्रमाण। संदेह नाहीं ॥ २३॥
ज्ञानेविण कर्म विघडे। हें तों कदापि न घडे ।
सद्गुरुवीण ज्ञान जोडे। हेंहि अघटीत ॥ २४॥
म्हणोन सद्गुरु करावा। सत्संग शोधून धरावा ।
तत्वविचार विवरावा। अंतर्यामीं ॥ २५॥
तत्वें तत्व निरसोन जातां। आपला आपणचि तत्वता ।
अनन्यभावें सार्थकता। सहजचि जाली ॥ २६॥
विचार न करितां जें जें केलें। तें तें वाउगें वेर्थ गेलें ।
म्हणोनि विचारीं प्रवर्तलें। पाहिजे आधीं ॥ २७॥
विचार पाहेल तो पुरुषु। विचार न पाहे तो पशु ।
ऐसी वचनें सर्वेशु। ठाई ठाई बोलिला ॥ २८॥
सिद्धांत साधायाकारणें। पूर्वपक्ष लागे उडवणें ।
परंतु साधकां निरूपणें। साक्षात्कार ॥ २९॥
श्रवण मनन निजध्यास। प्रचितीनें बाणतां विश्वास ।
रोकड साक्षात्कार सायास। करणेंचि नलगे ॥ ३०॥
इति श्रीदासबोधे गुरुशिश्यसंवादे
पुरुषप्रकृतीनाम समास नववा ॥

समास दहावा। :। चळाचळनिरूपण
। । । । ॥ श्रीराम ॥
गगनासारिखें ब्रह्म पोकळ। उदंड उंच अंतराळ ।
निर्गुण निर्मळ निश्चळ। सदोदित ॥ १॥
त्यास परमात्मा म्हणती। आणिक नामें नेणों किती ।
परी तें जाणिजे आदिअंतीं। जैसें तैसें ॥ २॥
विस्तीर्ण पसरला पैस। भोंवता दाटला अवकाश ।
भासचि नाहीं निराभास। जैसें तैसें ॥ ३॥
चहुंकडे पाताळतळीं। अंतचि नाहीं अंतराळीं ।
कल्पांतकाळीं सर्वकाळीं। संचलेचि असे ॥ ४॥
ऐसें कांहींयेक अचंचळ। ते अचंचळीं भासे चंचळ ।
त्यास नामेंहि पुष्कळ। त्रिविधा प्रकारें ॥ ५॥
न दिसतां नांव ठेवणें। न देखतां खूण सांगणें ।
असो हें जाणायाकारणें। नामाभिधानें ॥ ६॥
मूळमाया मूळप्रकृति। मूळपुरुष ऐसें म्हणती ।
शिवशक्ति नामें किती। नाना प्रकारें ॥ ७॥
परी जें नाम ठेविलें जया। आधीं वोळखावें तया ।
प्रचितीवीण कासया। वलगना करावी ॥ ८॥
रूपाची न धरितां सोये। नामासरिसें भरंगळों नये ।
प्रत्ययाविण गळंगा होये। अनुमानज्ञानें ॥ ९॥
निश्चळ गगनीं चंचळ वारा। वाजों लागला भरारां ।
परी त्या गगना आणि समीरा। भेद आहे ॥ १०॥
तैसें निश्चळ परब्रह्म। चंचळ माया भासला भ्रम ।
त्या भ्रमाचा संभ्रम। करून दाऊं ॥ ११॥
जैसा गगनी चालिला पवन। तैसें निश्चळीं जालें चळण ।
इछा स्फूर्तिलक्षण। स्फूर्णरूप ॥ १२॥
अहंपणें जाणीव जाली। तेचि मूळप्रकृति बोलिली ।
माहाकारणकाया रचली। ब्रह्मांडीची ॥ १३॥
माहामाया मूळप्रकृती। कारण ते अव्याकृती ।
सूक्ष्म हिरण्यगर्भ म्हणती। विराट ते स्थूळ ॥ १४॥
ऐसें पंचीकर्ण शास्त्रप्रमये। ईश्वरतनुचतुष्टये ।
म्हणोन हें बोलणें होये। जाणीव मूळमाया ॥ १५॥
परमात्मा परमेश्वरु। परेश ज्ञानघन ईश्वरु ।
जगदीश जगदात्मा जगदेश्वरु। पुरुषनामें ॥ १६॥
सत्तारूप ज्ञानस्वरूप। प्रकशरूप जोतिरूप ।
कारणरूप चिद्रूप। शुद्ध सूक्ष्म अलिप्त ॥ १७॥
आत्मा अंतरात्मा विश्वात्मा। द्रष्टा साक्षी सर्वात्मा ।
क्षेत्रज्ञ शिवात्मा जीवात्मा। देही कूटस्त बोलिजे ॥ १८॥
इंद्रात्मा ब्रह्मात्मा हरिहरात्मा। येमात्मा धर्मात्मा नैरूत्यात्मा ।
वरुणवायोकुबेरात्मा। ऋषीदेवमुनिधर्ता ॥ १९॥
गण गंधर्व विद्याधर। येक्ष किन्नर नारद तुंबर ।
सर्व लोकांचें अंतर। तो सर्वांतरात्मा बोलिजे ॥ २०॥
चंद्र सूर्य तारामंडळें। भूमंडळें मेघमंडळें ।
येकवीस स्वर्गें सप्त पाताळें। अंतरात्माच वर्तवी ॥ २१॥
गुप्त वल्ली पाल्हाळली। तिचीं पुरुषनामें घेतलीं ।
आतां स्त्रीनामें ऐकिलीं। पाहिजे श्रोतीं ॥ २२॥
मूळमाया जगदेश्वरी। परमविद्या परमेश्वरी ।
विश्ववंद्या विश्वेश्वरी। त्रैलोक्यजननी ॥ २३॥
अंतर्हेतु अंतर्कळा। मौन्यगर्भ जाणीवकळा ।
चपळ जगज्जोती जीवनकळा। परा पश्यंती मध्यमा ॥ २४॥
युक्ति बुद्धि मति धारणा। सावधानता नाना चाळणा ।
भूत भविष्य वर्तमाना। उकलून दावी ॥ २५॥
जागृति स्वप्न सुषुप्ती जाणे। तुर्या ताटस्ता अवस्ता जाणे ।
सुख दुःख सकळ जाणे। मानापमान ॥ २६॥
ते परम कठीण कृपाळु। ते परम कोमळ स्नेहाळु ।
ते परम क्रोधी लोभाळु। मर्यादेवेगळी ॥ २७॥
शांती क्षमा विरक्ती भक्ती। अध्यात्मविद्या सायोज्यमुक्ति ।
विचारणा सहजस्थिति। जयेचेनी ॥ २८॥
पुर्वी पुरुषनामें बोलिलीं। उपरी स्त्रीनामें निरोपिलीं ।
आतां नपुषकनामें ऐकिलीं। पाहिजे चंचळाचीं ॥ २९॥
जाणणें अंतःकर्ण चित्त। श्रवण मनन चैतन्य जीवित ।
येतें जातें सुचीत। होऊन पाहा ॥ ३०॥
मीपण तूंपण जाणपण। ज्ञातेंपण सर्वज्ञपण ।
जीवपण शिवपण ईश्वरपण। अलिप्तपण बोलिजे ॥ ३१॥

ऐसीं नामें उदंड असती। परी ते येकचि जगज्जोती ।
विचारवंत ते जाणती। सर्वांतरात्मा ॥ ३२॥
आत्मा जगज्जोती सर्वज्ञपण। तीनी मिळोन येकचि जाण ।
अंतःकर्णचि प्रमाण। ज्ञेप्तीमात्र ॥ ३३॥
ढीग जाले पदार्थाचे। पुरुष स्त्री नपुंसक नामांचे ।
परंतु सृष्टीरचनेचें। किती म्हणोन संगावें ॥ ३४॥
सकळ चाळिता येक। अंतरात्मा वर्तती अनेक ।
मुंगीपासून ब्रह्मादिक। तेणेंचि चालती ॥ ३५॥
तो अंतरात्मा आहे कैसा। प्रतुत वोळखाना आमासा ।
नाना प्रकारींचा तमासा। येथेंचि आहे ॥ ३६॥
तो कळतो परी दिसेना। प्रचित येते परी भासेना ।
शरीरीं असे परी वसेना। येके ठाईं ॥ ३७॥
तीक्षणपणें गगनीं भरे। सरोवर देखतां च पसरे ।
पदार्थ लक्षून उरे। चहूंकडे ॥ ३८॥
जैसा पदार्थ दृष्टीस दिसतो। तो त्यासारिखाच होतो ।
वायोहूनि विशेष तो। चंचळविषईं ॥ ३९॥
कित्येक दृष्टीनें देखे। कितीयेक रसनेनें चाखे ।
कितीयेक ते वोळखे। मनेंकरूनि ॥ ४०॥
श्रोतीं बैसोन शब्द ऐकतो। घ्राणेंद्रियें वास घेतो ।
त्वचेइंद्रियें जाणतो। सीतोष्णादिक ॥ ४१॥
ऐशा जाणे अंतर्कळा। सकळामधें परी निराळा ।
पाहातां त्याची अगाध लीळा। तोचि जाणे ॥ ४२॥
तो पुरुष ना सुंदरी। बाळ तारुण्य ना कुमारी ।
नपुंसकाचा देहधारी। परी नपुसक नव्हे ॥ ४३॥
तो चालवी सकळ देहासी। करून अकर्ता म्हणती त्यासी ।
तो क्षेत्रज्ञ क्षेत्रवासी। देही कूटस्त बोलिजे ॥ ४४॥

॥ श्लोक ॥
द्वाविमौ पुरुषौ लोके क्षरश्चाक्षर एव च ।
क्षरः सर्वाणि भूतानि कूटस्थोक्षर उच्यते ॥

दोनी पुरुष लोकीं असती। क्षराक्षर बोलिजती ।
सर्व भूतें क्षर म्हणती। अक्षर कूटस्त बोलिजे ॥ ४५॥
उत्तम पुरुष तो आणीक। निःप्रपंच निःकळंक ।
निरंजन परमात्मा येक। निर्विकारी ॥ ४६॥
च्यारी देह निरसावे। साधकें देहातीत व्हावें ।
देहातीत होतां जाणावें। अनन्य भक्त ॥ ४७॥
देहमात्र निरसुनी गेला। तेथें अंतरात्मा कैसा उरला ।
निर्विकारीं विकाराला। ठाव नाहीं ॥ ४८॥
निश्चळ परब्रह्म येक। चंचळ जाणावें माईक ।
ऐसा प्रत्यय निश्चयात्मक। विवेकें पाहावा। ४९॥
येथें बहुत नलगे खळखळ। येक चंचळ येक निश्चळ ।
शाश्वत कोणतें केवळ। ज्ञानें वोळखावें ॥ ५०॥
असार त्यागून घेईजे सार। म्हणोन सारासार विचार ।
नित्यानित्य निरंतर। पाहाती ज्ञानी ॥ ५१॥
जेथे ज्ञानचि होते विज्ञान। जेथें मनांचे होतें उन्मन ।
तेथें कैचें चंचळपण। आत्मयासी ॥ ५२॥
सांगणोवांगणीचें काम नव्हे। आपुल्या अनुभवें जाणावें ।
प्रत्ययाविण सिणावें। तेंचि पाप ॥ ५३॥
सत्यायेवढें सुकृत नाहीं। असत्यायेवढें पाप नाहीं ।
प्रचितीविण कोठेंचि नाहीं। समाधान ॥ ५४॥
सत्य म्हणिजे स्वरूप जाण। असत्य माया हें प्रमाण ।
येथें निरोपिलें पापपुण्य। रूपेंसहित ॥ ५५॥
दृश पाप वोसरलें। पुण्य परब्रह्म उरलें ।
अनन्य होतांच जालें। नामातीत ॥ ५६॥
आपण वस्तु स्वतसिद्ध। तेथें नाहीं देहसमंध ।
पापरासी होती दग्ध। येणें प्रकारें ॥ ५७॥
येरवी ब्रह्मज्ञानेंवीण। जें जें साधन तो तो सीण ।
नाना दोषांचे क्षाळण। होईल कैसें ॥ ५८॥
पापाचें वळलें शरीर। पापचि घडे तदनंतर ।
अंतरीं तोग वरीवरी उपचार। काय करी ॥ ५९॥
नाना क्षेत्रीं हें मुंडिलें। नाना तीर्थीं हें दंडिलें ।
नाना निग्रहीं खंडिलें। ठाईं ठाईं ॥ ६०॥
नाना मृत्तिकेनें घांसिलें। अथवा तप्तमुद्रेनें लासिलें ।
जरी हें वरीवरी तासिलें। तरी शुद्ध नव्हे ॥ ६१॥
सेणाचे गोळे गिळिले। गोमुत्राचे मोघे घेतले ।
माळा रुद्राक्ष घातले। काष्ठमणी ॥ ६२॥
वेष वरीवरी केला। परी अंतरीं दोष भरला ।
त्या दोषाच्या दहनाला। आत्मज्ञान पाहिजे ॥ ६३॥
नाना व्रतें नाना दानें। नाना योग तीर्थाटणें ।
सर्वांहुनी कोटीगुणें। महिमा आत्मज्ञानाचा ॥ ६४॥
आत्मज्ञान पाहे सदा। त्याच्या पुण्यास नाहीं मर्यादा ।
दुष्ट पातकाची बाधा। निरसोन गेली ॥ ६५॥
वेदशास्त्रीं सत्यस्वरूप। तेंचि ज्ञानियांचें रूप ।
पुण्य जालें अमूप। सुकृतें सीमा सांडिली ॥ ६६॥
या प्रचितीच्या गोष्टी। प्रचित पाहावी आत्मदृष्टीं ।
प्रचितीवेगळे कष्टी। होऊंच नये ॥ ६७॥
आगा ये प्रचितीचे लोक हो। प्रचित नस्तां अवघा शोक हो ।
रघुनाथकृपेनें राहो। प्रत्यय निश्चयाचा ॥ ६८॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
चळाचळनिरूपणनाम समास दहावा ॥
॥ दशक दहावा समाप्त ॥

Encoded and proofread by Vishwas Bhide.

Please send corrections to sanskrit@cheerful.com
Last updated October 15, 2005